



पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक

# हिंदुस्थान

७७ वर्ष स्नेह, विश्वास आणि परंपरेचे

www.dainikhindusthan.com
marathevinod62@gmail.com
epaper.dainikhindusthan.com

■ वर्ष ७७ वे/अंक २७ वा ■ ■ अमरावती,शुक्रवार दिनांक ११ सप्टेंबर २०२६ ■ ■ भारतीय सौर २० भाद्रपद १९४८ ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ ■ पृष्ठे १६ ₹ ४.०० ■







## एमपीएससी विद्यार्थ्यांच्या सर्व मागण्या मान्य

### परीक्षा गैरप्रकारांची एसआयटी चौकशी; आठ दिवसांत कार्यवाही सुरू करण्याची मुख्यमंत्र्यांची ग्वाही

मुंबई : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) विविध परीक्षांमधील कथित गैरप्रकार, पेपरफुटी, उत्तरपत्रिकांची उपलब्धता आणि भरती प्रक्रियेतील पारदर्शकता यासंदर्भात राज्यभरातील विद्यार्थी प्रतिनिधींनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबई येथे भेट घेतली. या वेळी विद्यार्थ्यांच्या सर्व मागण्या मान्य करत परीक्षा आणि भरती प्रक्रियेत सर्वंकष सुधारणा करण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले. यासंदर्भातील कार्यवाही पुढील आठ दिवसांत सुरू करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.



औषध निरीक्षक परीक्षेच्या कथित पेपरफुटीचा सखोल तपास सुरू असून तो शेवटच्या टप्प्यापर्यंत नेला जाईल. शासनाला गैरप्रकार लपविण्यात नव्हे, तर संपूर्ण परीक्षा प्रणाली सुधारण्यात रस असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. या प्रकरणातील गुन्हे शाखेच्या तपासाचा प्राथमिक अहवाल सार्वजनिक करण्यात येणार आहे.

एमपीएससीच्या परीक्षांमध्ये सर्वंकष सुधारणा सुचविण्यासाठी वरिष्ठ अधिकारी व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेखाली नवीन समिती स्थापन करण्यात येणार आहे. ही समिती राज्यभर दौरा करून विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि संबंधित घटकांशी संवाद साधणार आहे. विद्यार्थी प्रतिनिधींनी आपल्या तक्रारी आणि सूचना समितीसमोर खुलेपणाने मांडाव्यात, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले.

गट 'ब' आणि गट (उर्वरित पान २ वर)

## राज्यात तातडीने दुष्काळ जाहीर करा : हर्षवर्धन सपकाळ

मुंबई दि. १० : राज्यातील शेतकऱ्यांची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे पण सरकारचे मात्र त्यांच्याकडे लक्ष नाही. कुंभमेळ्यातील सीसीटीव्हीवर ३०० कोटी खर्च करणारे महायुती सरकार शेतकऱ्यांना काहीही मदत करत नाही. शेतकऱ्यांच्या हातातोंडाचा घास हिरावला जात असताना मंत्रिमंडळ बैठकीत यावर काहीही चर्चा झाली नाही. शेतकऱ्यांची अवस्था पाहता सरकारने तातडीने दुष्काळ जाहीर करावा आणि हेक्टरी ५० हजार रुपये मदत द्यावी, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.



नवी दिल्लीतील नविन महाराष्ट्र सदन येथे प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, महाराष्ट्रात सर्वात मोठा हंगाम खरिपाचा आहे, पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे. पेरण्या उशिरा झाल्या आणि आता १ महिन्यापासून पाऊस नाही. जे पेरले ते उगवले नाही व जे उगवले ते करपून गेले आहे. पावसाने दडी मारल्यानंतर कृत्रिम पाऊस पडण्याबाबत सरकारने पाऊल उचलायला पाहिजे होते पण सरकारने त्याकडे लक्ष दिले नाही. वीज गायब होत असल्याने ज्या ठिकाणी पाणी आहे तेथिल शेतकऱ्यांना पिकाला पाणीही देता येत नाही. सरकारने आतापासूनच टंचाईच्या अनुषंगाने नियोजन करावे. जनावरांना मिळणाऱ्या चाऱ्याची आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी. एकही बळी जाऊ नये यासाठी सरकारने काळजी घेतली पाहिजे. केंद्र सरकारच्या निकषाने शेतकऱ्यांना पैसे द्यावेत, असेही हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

**एमपीएससीचा कारभार काही सुधारत नाही**

राज्यातील लाखो विद्यार्थी सरकारी नोकरी मिळावी, अधिकारी व्हावे अशी स्वप्ने उराशी पुण्यात लाखो विद्यार्थी एमपीएससीची तयारी करत आहेत, यात ग्रामीण भागातील सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे पण चझडउ च्या भोंगळ कारभाराने या विद्यार्थ्यांच्या स्वप्नावर पाणी फेरले आहे. पेपरफुटी व अनागोंदी कारभाराने विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड असंतोष आहे, अनेकदा रस्त्यावर उतरून जाब विचारला तरीही एमपीएससीचा (पान २ वर)

## सेवामुक्तीनंतर अग्निवीरांना मिळणार सरकारी नोकरी

मुंबई दि. १० : केंद्र सरकारच्या 'अग्निपथ' योजनेअंतर्गत देशाची चार वर्षे प्रामाणिकपणे सेवा करून सेवामुक्त होणाऱ्या तरुण माजी अग्निवीरांना आता रोजगारासाठी भटकंती करावी लागणार नाही. सैन्यसेवेचा कार्यकाळ पूर्ण करणाऱ्या माजी अग्निवीरांना राज्यातील शासकीय व निमशासकीय सेवेत सन्मानाने पुनर्नियुक्ती देण्यासाठी राज्य शासनाने ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

विविध प्रशासकीय विभागांच्या अंतर्गत अन्य गणवेशधारी गट-क संवर्गासह महत्त्वाच्या विभागांमध्ये १ हजार अधिसंख्य पदे निर्माण करण्यास शासनाने अधिकृत मंजुरी दिली आहे. यामुळे चार वर्षांच्या कठोर लष्करी सेवेनंतर तरुणांना भवितव्याची (उर्वरित पान २ वर)

## ट्रक - व्हॅनच्या भीषण अपघातात ६ जण ठार

नांदेड दि. १० : नांदेड ते भोकर महामार्गावरील वाकद गावाजवळ ट्रक आणि एका प्रवासी व्हॅनचा भीषण अपघात झालाय. या अपघातात ६ जणांचा जागीच मृत्यू झालाय. तर ८ जण गंभीर जखमी झालेत. जखमींना तातडीने शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केलं आहे. मृतांचा आकडा वाढण्याची भीती वर्तवली जात आहे.

हाती आलेल्या माहितीनुसार, ट्रक भोकरकडून नांदेडकडे जात होता. त्यावेळी प्रवासी कारशी ट्रकची धडक झाली. या अपघाताचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झालेत. यात ट्रकचा पुढील भागाचे मोठे नुकसान झाले असून ट्रकच्या केबिनमध्ये चालक अडकलाय. नांदेड - भोकर महामार्गावरील वाकद गावाजवळ सीताखंडी येथे संध्याकाळच्या सुमारास (उर्वरित पान २ वर)

## जहाजाला भीषण आग २० जणांचा मृत्यू

बीजिंग दि.१० : पूर्व चीनमधील शेडोंगमध्ये किंगदाओ येथील बेहाई शिपयार्डमध्ये देखभालीसाठी उभ्या असलेल्या एका विदेशी ध्वजाच्या मालवाहू जहाजाला गुरुवारी सकाळी भीषण आग लागली. या दुर्घटनेत मोठी जीवितहानी आणि मोठे आर्थिक नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, मृतांचा नेमका आकडा २० सांगितला जात असून आगीचे कारण अद्याप अधिकृतपणे स्पष्ट करण्यात आलेले नाही.

किंगदाओ येथील 'बेहाई शिपबिल्डिंग कंपनी लिमिटेड'च्या बंदरात देखभालीसाठी हे विदेशी मालवाहू (उर्वरित पान २ वर)

## मनोज जरांगेंच्या आंदोलनाला मोठं यश १८ हजार २७६ कुणबी जात प्रमाणपत्रांचे वितरण

जालना दि. १० : कुणबी, कुणबी-मराठा आणि मराठा-कुणबी जातीचे प्रमाणपत्र पात्र व्यक्तींना देण्याची कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली गठित समितीने केलेल्या अभिलेख तपासणीत जालना जिल्ह्यात एकूण ५ हजार २७ नोंदी आढळल्या आहेत. या नोंदींच्या आधारे जिल्ह्यात प्राप्त १८ हजार २९५ अर्जांपैकी १८ हजार २७६ अर्ज मंजूर करून जात प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले आहे. मंजूर अर्जांचे प्रमाण ९९.९ टक्के आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी पत्रकार परिषदेत दिली. राज्य सरकारने उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्या १५ मागण्यासंदर्भात सकारात्मक निर्णय घेतले आहेत. त्यामुळे जरांगे पाटील यांनी उपोषण मागे घ्यावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत मराठा-कुणबी समाजाच्या विविध मागण्यांच्या अनुषंगाने शासन व जिल्हा प्रशासनाने मागील तीन वर्षांत केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी यावेळी दिली.



**सामाजिक सलोखा कायम राखण्यावर भर**

महाराष्ट्र हे प्रगतिशील, आधुनिक आणि विकासाभिमुख राज्य आहे. त्यामुळे समाजातील सर्व घटकांनी मतभेद टाळून शिक्षण, कौशल्यविकास, रोजगार आणि सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित करावे. मानवता ही प्रत्येकाची पहिली ओळख असली पाहिजे. जिल्ह्यातील तीन लाखांपेक्षा अधिक विद्यार्थी सामाजिक सलोखा आणि (उर्वरित पान २ वर)

## अबू सालेमची सुटका नाहीच सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली याचिका

मुंबई दि. १० : १९९३च्या मुंबई साखळी बॉम्बस्फोट प्रकरणातील दोषी आणि गँगस्टर अबू सालेम याला सर्वोच्च न्यायालयाकडून मोठा झटका मिळाला आहे. सालेमने केलेली सुटकेची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे.



तुरुंगातील चांगल्या आचरणामुळे आपली २५ वर्षांची शिक्षा पूर्ण झाल्याचा दावा सलेमने केला होता, परंतु न्यायालयाने बॉम्बे हायकोर्टाची गणनेची पद्धत योग्य ठरवत त्याची ही याचिका फेटाळली आहे.

गँगस्टर अबू सलेम याला २००५ मध्ये (पान २ वर)

### माहोल....




क्रूडऑईल चे दर वाढले म्हणजे आता महागाई सुरू झाली आहे असे समजायचे....

## ब्रिक्स परिषदेसाठी ७ वर्षानंतर शी जिनपिंग भारतात येणार

नवी दिल्ली दि. १० : चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग ब्रिक्स शिखर परिषदेसाठी शनिवारी भारतात दाखल होणार आहेत. सात वर्षांतील हा त्यांचा पहिला भारत दौरा असणार आहे. या दौऱ्यात ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचीही भेट घेतील अशी माहिती समोर आली आहे. या माहितीला चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने दुजोरा दिला आहे.



भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निमंत्रणावरून चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग १२ ते १३ सप्टेंबर दरम्यान नवी दिल्लीत होणाऱ्या १८ व्या ब्रिक्स शिखर परिषदेत सहभागी होतील, असे चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे. यापूर्वी, एएफपी या वृत्तसंस्थेशी बोलताना परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले होते की, शी जिनपिंग यांच्या दौऱ्याबाबत अजूनही कोणतीही अधिकृत माहिती उपलब्ध नाही.

**शी जिनपिंग यांचा दौरा महत्त्वपूर्ण ठरणार**

हा दौरा एक महत्त्वपूर्ण राजनैतिक घटना ठरेल अशी अपेक्षा आहे. अस्थिर जागतिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, दोन आशियाई महासत्तांमधील द्विपक्षीय संबंध स्थिर करण्याच्या आणि ब्रिक्स सहकार्याच्या प्रयत्नांवरही याचा परिणाम होईल. या (उर्वरित पान २ वर)











